प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001

DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

डिसेंबर 29, 2016

**इनसेट अक्षर नसलेल्या, अंक-फलकांमध्ये वाढत्या आकाराचे अंक असलेल्या आणि इंटाग्लिओ छपाई नसलेल्या रु.20 च्या बँक नोटांचे वितरण**

भारतीय रिझर्व बँक लवकरच, दोन्हीही अंक-फलकांमध्ये इनसेट अक्षर नसलेल्या व भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर डॉ. उर्जित पटेल ह्यांची सही असलेल्या आणि मागील बाजूवर ‘2016’ हे छपाईचे वर्ष छापलेल्या, महात्मा गांधी मालिका - 2005 मधील, रु.20 मूल्याच्या बँक नोटा वितरित करणार आहे.

आता देण्यात येणा-या ह्या बँक नोटांचे डिझाईन व सुरक्षा लक्षणे ही, वृत्तपत्र निवेदन क्र. 2016-2017/1402 दि. डिसेंबर 4, 2016 अन्वये प्रसिध्द केल्यानुसार, दोन्हीही अंकफलकात वाढत्या आकाराचे अंक असलेल्या, इंटाग्लिओ छपाई नसलेल्या व अलिकडेच देण्यात आलेल्या, महात्मा गांधी मालिका - 2005 मधील रु.20 च्या बँक नोटांप्रमाणेच असेल.

ह्या बँकेने, ह्यापूर्वी दिलेल्या रु.20 मूल्याच्या बँक नोटा वैध चलन असणे सुरुच राहील.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/1700**